सी.एन.आर.क्र. एम.एच.बी.यु. १९०००१६२०२२

<u>नि.दि.मु.क्र.०१/२०२२ मधील नि.क्र.३४ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींतर्फे त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळावी याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादींतर्फे थोडक्यात कथन असे की, ते व त्यांचे विधीज्ञ हे काही महत्वाच्या कामासाठी बाहेरगावी असल्यामुळे मागील तारखेवर त्यांचा लेखी जबाब दाखल करू शकले नाही. त्यामुळे न्यायालयाने प्रस्तुतचे प्रकरण त्यांचे विरुद्ध विना लेखी जबाब चालविण्याबाबत आदेश पारीत केला. सदर आदेश रद्द होवून त्यांना लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळणे अत्यंत न्याय व जरुरी आहे. सबब, प्रतिवादींतर्फे विनंती करण्यात आलेली आहे की, त्यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळावी.

०३. प्रस्तुत अर्जास वादीतर्फे आक्षेप थोडक्यात असा की, प्रस्तुत अर्जामध्ये कोणतेही संयुक्तिक कारण नमूद केलेले नाही. सबब, वादीतर्फे विनंती करण्यात आली आहे की, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०४. प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकनकरीता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी विहीत मुदतीत त्यांचा लेखी जबाब सादर केलेला नाही. अर्जातील नमूद कारणांचा विचार करीता, अर्जातील नमूद कारणे संयुक्तीक वाटत नाहीत. परंतु, असे असले तरी न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत दाव्याचा गुणदोषांवर कायमपणे निकाल होण्याकरीता, प्रतिवादी यांचा

लेखी जबाब अभिलेखावर असणे आवश्यक आहे, असे माझे मत आहे. नैसर्गिक न्याय तत्वांच्या दृष्टिकोनातुन विचार केल्यास, प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्याचे कामी त्याचे म्हणणे मांडण्यास संधी देणे हे न्यायदानाच्या दृष्टीने अपरिहार्य आहे. प्रतिवादी यांना तशी संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. उलटपक्षी, दावा कायमपणे गुणदोषांवर निकाली होण्यास मदतच होईल व निष्कारण न्यायालयीन प्रकरणे देखील वाढणार नाहीत. वादीला होणाऱ्या त्रासाचा विचारकरीता, त्यास योग्य तो खर्च देवून न्यायाचा समतोल राखता येईल असे माझे मत आहे. सबब, मी वरील चर्चित कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.३४ हा प्रतिवादी यांनी प्रत्येकी वादीस प्रत्येकी रु.५००/– (रक्कम रुपये पाचशे) इतका खर्च पुढील नेमले तारेखस किंवा तत्पुर्वी देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी यांनी वादी यास वर म्हणल्याप्रमाणे दिल्यानंतर, त्यांनी अर्जासोबत दाखल केलेला लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येईल.

**सही/–**

ठिकाण :– सिंदखेड राजा, आदित्य घ. नाईक

दिनांक : ०१/०८/२०२२ दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), सिंदखेड राजा,